## <u>निशाणी नं. ६४ वरील आदेश</u>

**१.** वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ व ५ यांचे वारस रेकार्डवर घेण्यासाठी झालेला प्रतिवादी क्र. २ करीता ३ वर्षे ६ महिने आणि ११ दिवसांचा व प्रतिवादी क्र. ५ करीता २ वर्षे १ महिना आणि १७ दिवसांचा विलंब माफ करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२.** सदर अर्जाला प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज करून टेनेबल नाही तसेच वादीने वाटपाकरीता दावा दाखल केला आहे. वादी प्रतिवादी एकमेकांचे नातेवाईक आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या वारसाबददले वादीला माहिती नाही हे कारण न पटणारे आहे त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

**३.** दाव्याचे सुंपर्ण निराकरण होण्यासाठी वादी यांना संधी देणे गरजेचे आहे. परंतु वादी यांनी सुमारे ३ वर्षे ६ महिने इतका विलंब केला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना नाहक त्रास सहन करावा लागला आहे. त्यामुळे विलंब माफ करण्यासाठी कॉस्ट करणे उचित ठरणार आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज वादीने प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/— इतकी कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वारस रेकार्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

**(पी.एन.पठाडे)**

दिनांक : २६/१०/२०२१. दुसरे सह दि.न्यायाधीश,क.स्तर,उरण.